जनार्थ आदिवासी विकास संस्था

# लोकजागर

अंक - २ । डिसेंबर २०१३

## स्त्रियांच्या आरोग्यासाठी विविध सरकारी योजना

## संपादकीय...

मातेचे आरोग्य चांगले राहिले तर मातेच्या आणि बाळाच्या जीवाला असलेला धोका कमी होतो. याच्या परिणामी मातामृत्यु आणि बालमृत्यु कमी होतील. हे लक्षात घेऊन मातामृत्यु व बालमृत्युचे प्रमाण कमी व्हावे यासाठी सरकारने मातेच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने काही योजना अंमलात आणल्या आहेत.

पण बऱ्याच वेळा लोकांना योजनेची माहिती नसल्यामुळे ते लाभापासून वंचित रहातात. म्हणून माता व बाल आरोग्यासंदर्भात राबवल्या जात असलेल्या योजनांची माहिती या अंकात देत आहोत. गावातील प्रत्येक व्यक्तीने माता व बाळ यांच्या हक्काबद्दल जागरूकपणे माहिती घेतली पाहिजे आणि इतरानासुद्धा दिली पाहिजे.

आपल्या गावातील किंवा घरातील गरोदर व स्तनदा माता आणि नवजात बाळं यांना या योजनांचा लाभ मिळाला आहे की नाही आणि योग्य वेळी त्याना लाभ मिळावा यासाठी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. निधीच्या स्वरूपात मिळणारा लाभ **आई आणि बाळ यांच्या आरोग्यासाठीच खर्च होईल** याचीही काळजी घेतली पाहिजे.

सर्व योजनांचे उद्दीष्ट मातामृत्यु व बालमृत्युचे प्रमाण कमी व्हावे हेच आहे.

म्हणून सर्वांनी अशा प्रकारे आपला खारीचा वाटा उचलला तर आपल्या गावातील संभाव्य मातामृत्यु व बालमृत्यु आपल्याला टाळता येतील. आईचा, बाळाचा जीव वाचवल्याचे समाधान मिळेल. हे समाधान सर्वांनाच अनुभवाला यावे एवढीच अपेक्षा!

मातृत्व अनुदान योजना...३

जननी सुरक्षा योजना...४

जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम...५

मानव विकास योजना...५

सावित्रीबाई कन्या कल्याण योजना....६

कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया....७

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ....७



नुकत्याच पंचायत समितीच्या निवडणुका पार पडल्या. सुगंधाबाई, गावात कुणाच्याही आन् कोणत्याही मदतीला जाणारी बाई. महिला आरक्षणातून सुगंधाबाई सरपंच म्हणून निवडून आल्या. सुगंधाबाईंची राजकारणात येण्याची ही पहिलीच वेळ होती. सुरूवातीपासून गावच्या एक सदस्य म्हणून त्यांच्या मनात प्रश्न असायचेच. आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी पटत नव्हत्या, खटकत होत्या. पण काय करावं, त्यातून मार्ग कसा काढायचा हे मात्र समजत नव्हतं. आपल्यापैकी अनेकांनाही आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी पटत नसतील, समजत नसतील पण आपण ते तसंच बाजूला ठेवून रोजचा पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी काम करत राहतो. पण सुगंधाबाईकडे आता 'सरपंच' हे गावचे प्रमुख पद आलेलं होतं. सुगंधाबाईंना मिळालेले पद आणि त्यांना लोकांबद्दल असलेली तळमळ यातून त्यांनी सरकारी योजना लोकांपर्यंत पोहचवण्याचं ठरवलं याबद्दल गावातल्या सगळ्यांशी बोलण्यासाठी २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या ग्रामसभेचं निमित्त साधलं.



सुगंधाबाईना आणखी एका गोष्टीबद्दल ग्रामसभेमध्ये बोलायचं ठरवलं होतं. सुगंधाबाईनी मदतीसाठी खूप धावपळ करूनही गेल्या महिन्यात गावामध्ये रमेशची बाई, नर्मदाबाई बाळंतपणात मरण पावली. या प्रसंगातून त्यांना बाईच्या आरोग्याबद्दल जास्त काळजी घेण्याची गरज जाणवली होती. त्याबद्दल ग्रामसभेत बोलायचं ठरवलं. ग्रामसभा म्हटली की पुरुषांचीच हजेरी जास्त असते पण या ग्रामसभेत गावातल्या जास्तीत जास्त बायांनी यावं म्हणून त्यांनी गावात बचत गटाच्या मार्फत बायांना निरोप पाठवला. ग्रामसभेची बाकी तयारी झालेली होती. सुगंधाबाईंनी अंगणवाडी बाई, आशा व नर्सबाईंशी बोलून बायांच्या आरोग्याबद्दल असणाऱ्या योजनांची माहिती तयार करून ठेवली होती.

ठरल्याप्रमाणे २६ जानेवारीला सकाळी १० वाजता ग्रामसभा सुरू झाली. बायांना निरोप पाठवल्यामुळे मोठ्या प्रमाणात बायापण आलेल्या होत्या. सुगंधाबाईने आलेल्या सर्वांचे स्वागत करून झेंडावंदन केले. बोलताना सुरुवातीलाच बाळंतपणात नर्मदाबाईच्या मरण्याच्या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केले आणि यापुढे आपल्याकडे अशी घटना घडणार नाही, यासाठी आपण सगळेजण प्रयत्न करूयात असे आवाहन केले.

नर्मदाबाईने गरोदरपणात सगळ्या तपासण्या करुन घेतल्या असत्या तर तिला काय त्रास होतोय हे कळलं असतं व त्यासाठी उपचार करता आला असता. ज्यामुळं तिचं मरण टाळता आलं असतं, असं नर्सबाईनं सागितलं. गावात यानंतर अशी घटना घडू नये म्हणून सरकारी आरोग्य केंद्रात गरोदर बाईला गरोदरपणासाठी व बाळंतपणासाठी मिळणाऱ्या सेवांबद्दलही नर्सबाईन माहिती दिली. या ग्रामसभेत आपण आरोग्याबाबत असणाऱ्या योजनांची माहिती घेऊ असे सांगून सुगंधाबाईने माहिती सांगायला सुरूवात केली.






**सुगंधाबाई :** बाईसाठी मूल जन्माला घालणं म्हणजे पुनर्जन्म घेण्यासारखंच असतं असं म्हणतात ते काही खोटं नाही. यामध्ये बाईला अनेक संकटांमधून जावं लागतं. गरोदरपणात आणि बाळंतपणात अशी काही गुंतागुंत होऊ शकते की ज्यामुळे आई किंवा बाळ किंवा दोघांच्याही जीवाला धोका तयार होऊ शकतो. गरोदर बाईने नियमित तपासण्या केल्यामुळे धोके आधीच ओळखता येतात व तिला वेळेवर योग्य उपचार मिळू शकतो. आदिवासी बाया गरोदरपणातील तपासण्यांसाठी येण्याचं प्रमाण खूप कमी आहे. या तपासण्या करण्यास त्यांना प्रोत्साहन मिळावं म्हणून अदिवासी भागात **'मातृत्व अनुदान योजना'** राबवली जाते.

## मातृत्व अनुदान योजना

**या योजनेसाठीची पात्रता:** दोन जिवंत मुलं असणाऱ्या आणि सध्या गरोदर असणाऱ्या स्त्रियानी बाळंतपणानंतर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेण्यास संमती दिल्यास.

**अर्ज कोणाकडे करावा (कोणाशी संपर्क साधावा):** नर्स, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी.

**योजनेतील लाभ :** या योजनेमध्ये सरकारी आरोग्य तपासणी केंद्रात तपासणीसाठी गेल्यावर ४०० रुपये रोख आणि ४०० रुपयांची औषधं दिली जातात.







तर काय वाटतंय? घरखर्चासाठी नाही तर, बाईच्या हातात ४०० रुपये मिळतात ते गरोदरपणातील काळजी घेण्यासाठी छोटीशी मदत म्हणून.

**पारताबाई (गावातील बाई):** मला बाळंतपणानंतर ७०० रुपये दिले होते.

**नर्सबाई:** बरोबर आहे बाई तुझं. पण ते पैसे वेगळ्या योजनेखाली दिले होते. ही दुसरी योजना म्हणजे **'जननी सुरक्षा योजना'.** गरोदरपणातील काळजी घेऊन बाळंतपण कोठे करायचे याची तयारीपण होणे गरजेचे आहे. बाळंतपण दवाखान्यात केल्यामुळे वेळेवर योग्य उपचार मिळू शकतात. बाई आणि बाळ सुरक्षित राहू शकते. बाळंतपणासाठी दवाखान्यात जावे म्हणून 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान'अंतर्गत **'जननी सुरक्षा योजना'** राबवली जाते.

# जननी सुरक्षा योजना

**या योजनेसाठीची पात्रता:**

* दारिद्र्य रेषेखालील म्हणजे पिवळे रेशन कार्ड असणाऱ्या गरोदर स्त्रिया.
* सर्व दलित व अदिवासी गरोदर स्त्रिया.

आता या योजनेचा लाभ मिळण्यासाठी बाईला वयाची अट नाही आणि तिच्या सगळ्या (म्हणजे दोनपेक्षा जास्त असली तरी सर्व) बाळंपणासाठी लाभ मिळू शकतो.

**अर्ज कोणाकडे करावा**
**(कोणाशी संपर्क करावा) :** नर्स, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी.

**योजनेतील लाभ:**

**ग्रामीण भागात**

* बाळंतपण दवाखान्यात केल्यावर ७०० रुपये दिले जातात.
* बाळंतपण घरी झाल्यास ५०० रुपये दिले जातात.

**शहरी भागात**

* बाळंतपण दवाखान्यात केल्यावर ६०० रुपये दिले जातात.
* बाळंतपण घरी झाल्यास ५०० रुपये दिले जातात.

सिझेरियन शस्त्रक्रिया करायची झाल्यास व त्यासाठी सरकारी दवाखान्यात तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्यास, खाजगी तज्ज्ञ डॉक्टरांना बोलावून त्यांची सेवा देण्यासाठी १५०० रुपये मानधन दिले जाते.

किंवा

शासकीय मान्यताप्राप्त खाजगी दवाखान्यात सिझेरियन झाल्यास १५०० रुपये अनुदान त्या खाजगी दवाखान्याला दिले जाते.

बाळंतपण दवाखान्यात झाल्यास पैसे नर्स किंवा सिस्टरांकडून लगेच मिळतात तर घरी बाळंतपण झाल्यास पैसे मिळण्यासाठी कमीत कमी सात दिवस लागतात. यासाठी नर्स किंवा आशा किंवा अंगणवाडी बाईची मदत घेता येते.

**आनंदीबाई (गावातील आशा):** आता तर, महिला व मुलांना अजून चांगल्या आरोग्य सुविधा पुरवण्याच्या उद्देशाने **'जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम'** हा राष्ट्रीय कार्यक्रम जाहीर केला आहे. या योजनेनुसार शहरी व ग्रामीण दोन्ही भागातील गरोदर महिलांना सरकारी आरोग्य केंद्रामध्ये बाळंतपणासाठीच्या सर्व सुविधा मोफत पुरवल्या जाणार आहेत. तसेच बाळाच्या आरोग्याच्या कोणत्याही समस्येवर एक वर्षापर्यंत मोफत उपचार केले जाणार आहेत.

# जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम




**या योजनेसाठीची पात्रता:**
* गरोदर असणाऱ्या स्त्रिया, बाळंत झालेल्या स्त्रिया
* एका वर्षापर्यंतचे बाळ.

**अर्ज कोणाकडे करावा (कोणाशी संपर्क साधावा) :** नर्स, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी.

**योजनेतील लाभ:**
* गरोदरपणातील सर्व तपासण्या व उपचार मोफत मिळतात.
* बाळंतपण दवाखान्यात व्हावे यासाठी घरापासून दवाखान्यापर्यंत आणि त्यानंतर दवाखान्यापासून घरापर्यंत मोफत प्रवासाची सोय केली आहे.
* मोफत आणि विनामूल्य बाळंतपण केले जाते व सिझेरियन सुविधाही मोफत आहे.
* संदर्भ सेवा लागल्यास त्या ठिकाणची येण्याजाण्याची मोफत सोय केली जाते.
* तीन ते सात दिवस मोफत आहार मिळतो.
* औषधे व इतर उपयोगी वस्तू तसेच रक्ताची मोफत सुविधा मिळते.
* बाळाच्या कोणत्याही समस्येवर एक वर्षापर्यंत मोफत उपचार केले जातात.

**वरील सर्व सुविधा आजारी बाळालाही मोफत आहेत.**

जननी सुरक्षा योजनेनुसार गरोदर बाईला मिळणारा आर्थिक लाभ या योजनेबरोबरही लागू आहे. शिवाय त्या बाईच्या व बाळाच्या आजारपणावर जो खर्च होतो तोही भरून काढायचा प्रयत्न या योजनेने केला आहे.

**आनंदीबाई (आशा):** गरोदर असलेली बाई पार बाळंतपण होईपर्यंत राबत असती. तसं पाहिलं तर तिनं शेवटच्या महिन्यात कष्टाची कामं करायला नकोत. पण पोटापाण्यासाठी मजुरीला जावं लागतं. म्हणून सरकारने गरोदरपणाच्या नवव्या महिन्यात बाईला आराम मिळावा यासाठी '**मानव विकास योजना**' सुरु केली आहे.

# मानव विकास योजना

**या योजनेसाठीची पात्रता:** **दारिद्र्य रेषेखालील गरोदर महिला**

**अर्ज कोणाकडे करावा (कोणाशी संपर्क साधावा) :** नर्स, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी.

**योजनेतील लाभ:**
* गरोदरपणातील नवव्या महिन्यात बाईला आराम मिळावा, मजूरी करायला लागू नये. याकरिता तिला बुडीत मजुरी म्हणून ८०० रुपये चेकद्वारे दिले जातात.

**झिलाबाई:** पहाडात दवाखान्यात जायला गाडीच मिळत नाही. आता तुम्ही गाडीत बायांना नेणार परत घरी आणून सोडणार तर सगळे दवाखान्यातच जाणार.

सगळे हसायला लागतात.

**मोगरीबाई (अंगनवाडी ताई):** अजून एक महत्त्वाची योजना. समाजात बाईला 'मुलगाच झाला पाहिजे' असं सगळ्यांनाच वाटायला लागलय. खरतर मुलगा–मुलगी एक समान आहेत, आपल्याकडं असा भेदभाव कुणी करत नाही. **'सावित्रीबाई कन्या कल्याण योजना'** म्हंजे ज्यांनी दोन मुली झाल्यानंतर कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली म्हणून प्रोत्साहनपर ही योजना आहे.

## सावित्रीबाई कन्या कल्याण योजना

**या योजनेसाठीची पात्रता :** दारिद्र्य रेषेखालील फक्त एक किंवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतलेले जोडपे.

**अर्ज कोणाकडे करावा (कोणाशी संपर्क साधावा) :** नर्स, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी.

**योजनेतील लाभ :**

* फक्त एका मुलीवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्यास मुलीच्या नावावर ८,००० रुपयांचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र मिळते. शिवाय आई–वडिलांपैकी ज्या व्यक्तीने नसबंदी केली असेल त्यांच्या नावाने २००० रुपये चेकने मिळतात.
* दोन मुलींवर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्यास ४,००० रुपयांपर्यंतचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र मुलीच्या नावावर मिळते. शिवाय आई–वडिलांपैकी ज्या व्यक्तीने नसबंदी केली असेल त्यांच्या नावाने २००० रुपये चेकने मिळतात.







**नर्स:** पुढची पिढी तयार करायची जबाबदारी जास्त बायांवर पडते. घरातील कामं, मजूरी, सारखी होणारी बाळंतपणं आणि मुलांची जबाबदारी यात बाईला तिच्या तब्बेतीकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. त्यामुळे तिच्या तब्बेतीच वाट लागते. या सगळ्या गोष्टींचा विचार करुन दोघांनी योग्य वेळेत कुटूंब नियोजन करावे.

कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया स्त्री आणि पुरुष दोघांची करता येते. खरतर पुरुषांची शस्त्रक्रिया सोप्पी आणि बायांची अवघड असते. या योजनेत कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेसाठी सरकारकडून मोबदला दिला जातो.

## कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया

**या योजनेसाठीची पात्रता:** कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केलेले स्त्री किंवा पुरुष.

**अर्ज कोणाकडे करावा (कोणाशी संपर्क साधावा) :** प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी.

**योजनेतील लाभ:**

* **पुरुष नसबंदी –** या शस्त्रक्रियेनंतर संबधित पुरुषाला १४५१ रुपये मिळतात.
* **स्त्री नसबंदी –** अनुसूचित जाती आणि जमातीतील दारिद्र्य रेषेखालील महिलेला या शस्त्रक्रियेनंतर ६०० रुपये मिळतात.
* दारिद्र्य रेषेवरील कोणत्याही महिलेला २५० रुपये मिळतात.




**नर्स:** आपल्याला मोठ्या आजारांवर उपचार घेता यायला पाहिजे म्हणून सरकारने नविन योजना सुरु केली आहे. या योजनेत सरकारी मान्यताप्राप्त खाजगी दवाखान्यात उपचार घेतल्यावर त्याचे पैसे सरकार भरणार. ही योजना म्हणजे **'राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना.'**

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना

**या योजनेसाठीची पात्रता:**

* दारिद्र्य रेषेखाली कुटूंब
* १ लाखापेक्षा कमी उत्पन असलेले कुटूंब.

**योजनेतील लाभ :**

* प्रत्येक वर्षाचा प्रत्येक कुटुंबाचा संपूर्ण विमा हप्ता शासन देणार आहे.
* काही खाजगी रुग्णालयांना या योजने अंतर्गत घोषित केले आहे. याच ठिकाणी मोफत उपचाराची सेवा उपलब्ध आहे.

* दवाखान्यात रुग्णाने प्रवेश केल्यापासून तपासणी, परीक्षण व रोगनिदान, वैद्यकीय उपचार औषधे, शस्त्रक्रिया रुग्णाचा परतीचा प्रवास भोजन आणि उपचारांचा पाठपुरावा यासाठीचा संपूर्ण खर्च या योजने अंतर्गत केला जातो.
* एका व्यक्तीसाठी किंवा कुटुंबासाठी रुग्णालयात भरती झाल्यानंतर रु. १,५०,०००/- पर्यंत खर्च करता येईल. तर मूत्रपिंडाच्या उपचारासाठी रु. २.५ लाखापर्यंतचा खर्च पहिल्या वर्षामध्ये करता येईल.
* या योजने अंतर्गत गंभीर स्वरूपाच्या आजारांवर उपचार करता येतात. उदा. हृदयरोग, कॅन्सर, मेंदूचे विकार, मूत्रपिंडाचे आजार इ.

विम्याची भरपाई सात दिवसांमध्ये करण्यात येते. मात्र यासाठी आपण मूळ बिले, तपासणीची आणि रोगनिदान केल्याची कागदपत्र, डिसचार्जकार्ड, डॉक्टरांची सही आणि शिक्का असलेले आणि आजाराशी निगडीत कागदपत्र सादर करणे गरजेचे आहे. तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये झिरो बॅलन्सवर नवरा-बायको यांचे संयुक्त बचत खाते उघडावे लागते.

या योजनेचा उपयोग करून घेण्यासाठी जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, खाजगी दवाखान्यातील आरोग्य मित्र आणि वैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.

शासनाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी वेगळी संस्था स्थापन केली आहे. या योजनेची संपूर्ण अंमलबजावणी आणि देखरेख या समितीद्वारे करण्यात येते.

समारोप करताना सुगंधाबाई म्हणाल्या, ''या सर्व सरकारी योजना समजल्या आहेत, या योजनांचा लाभ आपल्या गावातील सगळ्यांनी घ्यावा असा आपण सगळे मिळून निर्धार करूयात. या योजनेसाठी आपल्या गावातील आशा, अंगणवाडीबाई, नर्सबाई यांची मदत घेऊयात. यात काही अडचण आली तर सरपंच म्हणून मी तुमची मदत करायला नेहमीच तयार असेल.'' ग्रामसभेसाठी जमलेल्या सर्वांचे आभार मानून सुगंधाबाईने आपले बोलणे थांबवले.

गावातील सर्वांसाठी ग्रामसभेतील ही माहिती खूपच फायदेशीर ठरली.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्यसेवांवर देखरेख करण्यासाठी 'आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन समित्या' तयार करण्यात आल्या आहेत. या समित्या गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर कार्यरत आहेत.

या समित्या स्थानिकपातळीवर आरोग्यसेवेचा हक्क आपल्या सर्व लोकांना मिळण्यासाठी जनजागृती करतात. सेवा जर मिळत नसतील तर त्या मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. तसेच एखाद्या पेशंटचा हक्क नाकारला असेल तर त्याला न्याय मिळावा म्हणून आणि सरकारी आरोग्यसेवा आपल्या आहेत व त्या बळकट व्हाव्यात, त्यात सुधारणा व्हावी म्हणून प्रयत्न करतात.

म्हणूनच, या योजनांसाठी अर्ज करूनही लाभ मिळण्यास काहीही अडचण आली तर आपल्या गावातील आरोग्य समितीकडेही तक्रार करू शकतो.

## आपण काय करू शकतो ?

* सुगंधाबाईने सांगितलेली योजनांची माहिती आपण आपल्या गावामध्ये सांगू शकतो.
* आपल्या गावातील ग्रामसभेमध्ये नर्स, डॉक्टर यांना बोलावून यासारख्या आरोग्याच्या योजनांची माहिती घेऊ शकतो.
* या योजनांचा आपल्या घरातील आणि गावातील सगळ्यांना मिळाव्यात यासाठी प्रयत्न करू शकतो.

**या योजना आपल्यासाठी आहेत त्याचा लाभ घेण्यासाठी आपण प्रयत्न करूयात.**

संदर्भ पुस्तिका: १. विकासाच्या योजना:आपल्यासाठी, तथापि-माविम, २. चित्रे: साथी व संकेतस्थळे

**जनार्थ आदिवासी विकास संस्था**
प्लॉट नं. ८, रमागिरी, विजयनगर, शहादा-४२५४०९, जि.-नंदुरबार
☎ ०२५६५-२२३१६५/ २२५४९५ ईमेल : janarthorg@rediffmail.com
UKaid
ऑक्सफॅम इंडिया OXFAM India